जा.क्र.क.आ.जवाहर हुपरी- यळगूड/निवडणूक/सा.स.नो./११ /२०२४-२०२९/२०२४

# कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,

हुपरी-यळगूड ४१६ २०३, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र)

## साधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

शनिवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४, स्थळ-कारखान्याचे कार्यस्थळ, वेळ-सकाळी ११.०० (अकरा) वाजता

सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचेकडील दि.१९/८/२०२४ रोजीच्या मंजूरीस अनुसरून दि मल्टी स्टेट को-ऑपरेटीव्ह सोसायटीज अ‍ॅक्ट अ‍ॅण्ड रूल्स २००२ मधील तरतूदीनुसार कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,हुपरी-यळगूड, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर या संस्थेच्या संचालक मंडळाच्या सन २०२४ ते २०२९ या पंचवार्षिक कालावधीकरीता घ्यावयाच्या निवडणूकीसाठी संस्थेची साधारण सभा शनिवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० (अकरा) वाजता कारखान्याच्या कार्यस्थळावर बोलावणेत येत आहे. तरी आपण सदर सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची निवडणूक सन २०२४ ते २०२९ या कालावधीकरीता निवडणूक कामकाज करणे..

अ. सदर निवडणूक ही कारखान्याच्या पोटनियम क्रमांक ३० मधील तरतूदीनुसार खालील प्रतिनिधींकरीता असेल.

१. सामान्य उत्पादक सभासदांमधून निवडून द्यावयाचे सर्वसाधारण प्रतिनिधी १४ (चौदा)
२. सामान्य उत्पादक सभासदांमधून निवडून द्यावयाचे अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती प्रतिनिधी १ (एक)
३. सामान्य उत्पादक सभासदांमधून निवडून द्यावयाचे महिला प्रतिनिधी २ (दोन)
४. सामान्य बिगर उत्पादक व संस्था सभासदांमधून निवडून द्यावयाचे प्रतिनिधी २ (दोन)

ब. वरील प्रतिनिधींच्या निवडीची पात्रता ही दि मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज अ‍ॅक्ट अ‍ॅण्ड रूल्स २००२ व संस्थेच्या पोटनियमातील तरतूदीनुसार राहील.

क. सदर निवडणूकीकरीता नामनिर्देशन पत्रे देणे व स्विकारण्याची मुदत दिनांक १४/११/२०२४ ते दिनांक २०/११/२०२४ या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत राहील. (गुरूनानक जयंती दि.१५/११/२०२४ व रविवार, दि.१७/११/२०२४ या दिवशी कार्यालयीन कामकाज बंद राहील)

ड. नामनिर्देशन पत्रांची छाननी दिनांक २१/११/२०२४ रोजी सकाळी ११ ते ३ या वेळेत होईल.

इ. दि मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज रूल्स २००२ चे नियम १९-एम (१) मधील तरतूदीनुसार निवडून द्यावयाच्या एकूण पदा इतकीच वैध नामनिर्देशन पत्रे आली असल्यास ते उमेदवार निवडून आल्याचे सदर साधारण सभेत घोषित करण्यात येईल. तथापि एकूण निवडून द्यावयाच्या पदापेक्षा जास्त वैध नामनिर्देशन पत्रे असल्यास मतदान शनिवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ४.०० या कालावधीत घेणेत येईल. यासाठी मतदान ठिकाण व केंद्राबाबतची माहिती प्रसिध्द करण्यात येईल. मतमोजणी रविवार, दि.१/१२/२०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता सुरू होईल. सोमवार, दि.२/१२/२०२४ रोजी सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या मंजूरीने निकाल घोषित करण्यात येईल.

KALLAPPANNA AWADE JAWAHAR SHETKARI SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD. * HUPARI *
Returning Officer
District Collector and
District Magistrate,
Kolhapur
2024-2029

स्थळ : हुपरी-यळगूड.
प्रसिध्द : दि. १३/११/२०२४

अमोल जगन्नाथ येडगे (भा.प्र.से.)
निवडणूक निर्णय अधिकारी,
(जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, कोल्हापूर)
कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,
हुपरी-यळगूड ४१६ २०३, तालुका-हातकणंगले, जिल्हा-कोल्हापूर